Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-IX Sept. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

स्मृतिस्थळ हा एक गद्य चरित्रग्रंथ

डॉ. बी.व्ही.डिगोळे
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

'स्मृतिस्थळ' हा महानुभावांच्या चरित्र ग्रंथापैकी एक प्रसिध्द चरित्र ग्रंथ आहे. ज्याप्रमाणे लीळाचरित्र हे चक्रधरांचे चरित्र आहे. किंवा गोविंदप्रभुचरित्रात गोविंदप्रभूंच्या संदर्भात अनेक घटना वर्णन केल्या आहेत, त्याप्रमाणे स्मृतिस्थळ हा ग्रंथ म्हणजे नागदेवाचार्य ऊर्फ भटोबास यांचे चरित्र आहे. ज्याप्रमाणे चक्रधरांच्या निर्वाणानंतर महानुभाव पंथात कांही काळ पोकळी निर्माण झाली चक्रधरांच्या आठवणीने सर्वांना अस्वस्थ केले. आणि त्या आठवणीतूनच लीळाचरीत्राची निर्मिती झाली. त्याप्रमाणे भटोबासाच्या निर्वाणानंतर महानुभावपंथात पुन्हा एकदा पोकळी निर्माण झाली. भटोबासांच्या प्रेमळ मार्गदर्शनाच्या अभावी महानुभाव पंथ पोरका झाला. त्यामुळे तर या पंथातील अनुयायांना भटोबासांच्या आठवणींनी अस्वस्थ केले. त्या मनस्थितीतूनच स्मृतिस्थळ या चरित्रग्रंथाची निर्मिती झाली. भटोबास या चरित्राचे मुख्य नायक असले तरी, महानुभाव पंथातील म्हाइंभट, नरेंद्र पंडित, दामोदर पंडित, महदाईसा, केशीराजबास यासारख्या थोर ग्रंथकारांच्या चरित्र कथा देखील स्मृतिस्थळात आल्या आहेत. त्यामुळे 'स्मृतिस्थळ' हा महानुभाव पंथातील आघाडीच्या साहित्यकृर्तीची निर्मिती कोणत्या प्रेरणेतून झाली हेही कथन करतो. महानुभाव चरित्रग्रंथाचे व्यवच्छेदक (एखाद्या वस्तूचे निराळेपण दाखवणे) लक्षण म्हणजे 13 व्या शतकातील समाजाचे दर्शन होय. स्मृतिस्थळात तर प्रकर्षाने यादवकाळातील आणि यादवांच्या ऱ्हास काळातील समाजाचे धार्मिक, राजकीय, सामाजिक प्रतिबिंब उमटले आहे. लीळाचरित्राच्या खालोखाल स्मृतिस्थळास महत्वाचे स्थान दिले जाते.

'स्मृतिस्थळा'चा कर्ता नरेंद्र पंडित आहे असे मानले जाते. परंतु अधिक चिकित्सा केल्यानंतर असे आढळते की, नरेंद्राने स्मृतिस्थळाची रचना केलेली नाही. कारण स्मृतिस्थळात नरेंद्रासंबधीच्या कांही स्मृति आहेत. त्यात 113 क्रमांकाची स्मृति नरेंद्रबासाभेटी अनुसरूण या संदर्भातील आहे.

"नरेंद्र कवी : साल कवी :
नरसिंह कवी हे तिघे भाऊ:
तेथ नरेंद्र कवी बैसले होते:
तयासि भटोबासांपासैनि श्रवण होते:
मग नरींद्रबासी तेणे सके अठरासते
रुक्मिणीसैंवर ग्रंथ केला."

नरेंद्राने राजा रामदेवराव यादव आश्रय सोडला. आणि रूक्मिणीस्वयंवर ग्रंथासह महानुभाव पंथात आला. ही घटना 113 क्रमांकाच्या स्मृतित नरेंद्रबासाचा उल्लेख तृतीय पुरूषी स्वरूपात केलेला आढळतो. नरेंद्रानेच या लीळेत स्वत:विषयी नरेंद्र कवी, नरिंद्रबास असा तृतीयपुरूषी उल्लेख केला असेल ही गोष्ट खरी वाटत नाही. त्यामुळे स्मृतिस्थळाचा कर्ता नरेंद्र नसून नरेंद्राच्या व्यतिरिक्त कोणीतरी या ग्रंथाची निर्मिती केली आहे हे सिध्द होते.

स्मृतिस्थळातील अनेक स्मृति शोध एकिवासना या शीर्षकाखाली अनेक पाठभेद दिलेले आढळतात. अर्थात या टीपानंतरच्या काळातील लोकांनी दिलेल्या आढळतात. त्यामुळे देखील या स्मृतिस्थळाचे कर्तृत्व नरेंद्रबासाकडे येत नाही. तथापि तळेगावकर अन्वयस्थळात (फोड करणे, अर्थ उलगडून दाखवणे) नरेंद्राने 700 स्मृतिंची रचना केली असा उल्लेख आढळतो.)

"नरेंद्रबासी रुक्मिणीसैंवर केले
आणि सातसे स्मृति जैसीया वर्तल्या
तैस्याचि लिहिल्या:"

परंतु हा एक अपवाद वगळता बाकीच्या महानुभाव अन्वयस्थळात स्मृतिस्थळाचे कर्तृत्व मालोबास, परशुराम बास, ओंकारबास यांच्याकडे दिलेले आढळते आणि हीच गोष्ट जास्त खरी वाटू लागते. कारण या ग्रंथात आलेल्या अनेक वासना शोध यांची संगती त्याशिवाय लागू शकत नाही. आज उपलब्ध असलेले स्मृतिस्थळ 260 स्मृतिचे आहे. यातील शेवटची स्मृति भटोबासांच्या निधनांची आहे. भटोबास यांचे निधन शके 1224 म्हणजेच इ.स.1302 मध्ये झाले. अर्थातच स्मृतिस्थळाच्या निर्मितीस इ.स. 1802 नंतर सुरूवात झाली असली पाहिजे आणि त्याचा शेवट 14 व्या शतकाच्या उत्तरार्धात झाला असावा. कारण स्मृतिस्थळात उल्लेखिलेल्या अनेक व्यक्तींचे काळ 13 व्या शतकाच्या अखेरपर्यंत आढळतात. त्यामुळे स्मृतिस्थळ हे कुणीतरी एका व्यक्तीने एकटाकी लिहिले असे आढळत नाही. त्यात वेळोवेळी माहितीची भर घालण्यात आली आणि त्यातूनच आजचा स्मृतिस्थळ हा ग्रंथ सिध्द झाला आहे.

यादवकाळात आणि त्यानंतर देखील मराठीत विपुल प्रमाणात काव्यग्रंथाची निर्मिती झालेली आढळते. परंतु 'स्मृतिस्थळ', 'लीळाचरित्र' यासारख्या गद्य ग्रंथाची निर्मिती हे महानुभावपंथी यांचेच खास वैशिष्टये म्हणावे लागेल. गद्यलेखनाची ही यादवकाळातील प्रवृत्ती एक खास वैशिष्टय आहे. यादवकालीन बोलीभाषेतून लिहिलेल्या लीळाचरित्रातील लीळा स्मृतिस्थळातील स्मृति म्हणजे प्राचीन गद्याचा उत्कृष्ट अविष्कार आहेत. ज्याप्रमाणे मुकुंदराजाने प्रबंध लेखनाची परंपरा 'विवेकसिंधू' च्या स्वरूपात निर्माण केली किंवा ज्ञानेश्वरांनी अभंग वाङ्मयाची परंपरा निर्माण केली किंवा नरेंद्राने संस्कृत महाकाव्याचा प्रवाह मराठीत आणून सोडला. त्याप्रमाणे महानुभाव चरित्रकाराने यादव काळातीलल बोली भाषेचा सुंदर अविष्कार आपल्या चरित्र ग्रंथातून केला. महानुभावांनीच इतके सुंदर गद्य का निर्माण केले ? याचे कारण त्या गद्याच्या निर्मितीच्या प्रेरणेत आहे चक्रधर, गोविंदप्रभू, नागदेवाचार्य या थोर व्यक्तिंच्या निधनानंतर त्यावेळी हाळव्या बनलेल्या व्यक्तींनी आपल्या आठवणींचा संग्रह केला. अर्थात या आठवणी त्या काळच्या बोली भाषेत होत्या. त्या बोलीभाषेतूनच आठवणींचे संग्रह तयार झाले. यादवकाळातील बोली भाषेची सौंदर्य प्रसाधने धारण करूनच महानुभावांचे गद्य ग्रंथ (लीळाचरित्र, गोविंदप्रभूचरित्र, स्मृतिस्थळ इत्यादी) निर्माण झाले. छोटी छोटी वाक्यांचे नादमधूर आवर्तन यादवकालीन अनेक वाक्प्रयोग, म्हणी इत्यादीमुळे अनेक प्रसंग, संवाद जिवंत वाटतात. मराठीच्या अविष्काराचे सामर्थ्य किती प्रभावी होते. याचा अनुभव स्मृतिस्थळातही येते.

लीळाचरित्राप्रमाणे 'स्मृतिस्थळ' हा देखील एक श्रेष्ठ चरित्र ग्रंथ आहे. यात लीळाचरित्राप्रमाणे छोटया-छोटया आठवणींनी चरित्राची बांधणी सांधली आहे. ज्याप्रमाणे रांगोळी काढण्यापूर्वी सुरूवातीस अनेक टिंबाची रचना केली जाते आणि त्यांना विशिष्ट प्रकारे सांधून पाने, फुले इत्यादी आकृती निर्माण केल्या जातात. त्याप्रमाणे छोटया छोटया आठवणींच्या द्वारे स्मृतिस्थळात नागदेवाचार्य, म्हाइंभट, केशिराजबास इत्यादी व्यक्तिंची जिवंत चित्रे रेखाटली आहेत.

''होत तेथ भटोबास मानीती
नव्हे तेथ म्हणती
हे श्रीमुखाचे शब्द नव्हे ती हे होति''

त्यामुळे स्मृतिस्थळाचा तोंडवळा लीळाचरित्रासारखाच वाटतो. लीळाचरित्राची भाषा समृध्द आहे. त्याचप्रमाणे स्मृतिस्थळात ही भाषा अतिशय लडीवाळ व मृदू आहे. परंतु स्मृतिस्थळ एकदम लीळाचरित्रासारखाच चरित्र ग्रंथ आहे असे समजणे चुकिचे ठरेल. कारण लीळाचरित्रात ज्याप्रमाणे सलगपणे, कालक्रमानुसार सुसंगत असे चक्रधरांचे चरित्र आढळते. त्याप्रमाणे स्मृतिस्थळाची रचना नाही. यात ज्या 260 स्मृति आहेत त्यातील घटनांना तसा कोणताही कालक्रम नाही.

एक दिसु ब्राम्हणे यकें भटोबासा पुसिले
एकवेळ केशराजबास अटना एकलेचि गेले होते
एकू दिस भटोबास धर्मवार्ता करित होते

अशा प्रकारची स्मृतिंची सुरूवात असते. त्यात कोणताही सुसंगत कालक्रम नसतो. फार तर एखाद्या व्यक्तीच्या संदर्भातील घटना सलगपणे दोन तीन वर्णन केलेल्या आढळतात.

उपाध्येचीय अनुभवीचीया तिया

उपाध्याते पुसाववीया
नाथोचीया अनुभवीचीया
त्या नाथो रे पुसावीया
जयाचीये अनुभवीची त्या त्यातेचि पुसाविया

उदा:- स्मृति क्र. 98,99,100 यातून खेइंभटा संबंधीच्या आठवणी वर्णन केल्या आहेत. किंवा स्मृति क्र. 117, 118, 119, 120, 121, 122 या स्मृति कवीश्वरबासाच्या (भास्करभट्ट बोरीकर) आठवणी कथन करतात. याप्रमाणे कांही ठिकाणी स्मृतितून व्यक्तींची सलग प्रसंग वर्णनातून चित्रणे आढळतात. परंतु लगेच तो ओघ खंडीत होतो. आणि दुसरा विषय सुरू होतो. त्यामुळे लीळाचरित्राप्रमाणे स्मृतिस्थळ हे कालाक्रमानुसार सलग व सुसंगत असे चरित्र नाही. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. पण त्यामुळे ही चांगली गोष्ट घडली. ती म्हणजे लीळाचरित्रातील ही सलगता येण्यासाठी चक्रधरांच्या संदर्भातील अनेक लहान सहान व शुल्लक वाटणाऱ्या अनेक घटनांचे वर्णन केलेले आढळते.

उदा :-एखाद्या लीळेत चक्रधर यांनी आमुक गावी मुक्कम केला आणि दुसरे दिवसी ते पुढील गावी निघाले असे वर्णन लीळाचरित्रात आढळते. आपल्या गुरूसंबंधी एकही आठवण राहता कामा नये. यादृष्टीने अशा नोंदी महत्वाच्या असतील; परंतु चरित्राच्या दृष्टीने अशा नोंदीचे मूल्य शून्य; पण स्मृतिस्थळात अशा प्रकारच्या शून्य मूल्य असलेल्या नोंदी आढळत नाहीत. ज्या कांही नोंदी आहेत त्यातून स्मृतिस्थळातील व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचे अनेक रंग फुलताना आढळतात.

संदर्भग्रंथ :-

1) वा.ना. देशपांडे, 'स्मृतिस्थळ', व्हीनस प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती, 1997
2) प्र.न.जोशी, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे, सुधारलेली दुसरी आवृत्ती, 1978
3) ल.रा.नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती, 1997
4) मोहन शेळके, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद
5) श्रीधर कुलकर्णी, 'मध्ययुगीन मराठी साहित्य : एक पुनर्विचार', राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1995
6) कृ.प.देशपांडे, 'सातीग्रंथः स्वरूप आणि समीक्षा', सन पब्लिकेशन, पुणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com